गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे ● अंक १०८ वा ● बुधवार ०४ सप्टेंबर २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 108 | Date : 04/08/2024 | blow Wednesday | Page 4 Price 4

## महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदला, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आवाहन

### विधान परिषदेच्या शतक महोत्सवी कार्यक्रमात मार्गदर्शन



**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई : महिलांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासाशिवाय देशाचा संपूर्ण विकास अशक्य आहे. महिलांकडे बघण्याच्या दृष्टिकोन बदलायला हवा. महिलांना संधी द्या, सहकार्य करा. आज महिला चालत आहेत, पुढे जाऊन त्या धावतील आणि उंच उडी घेत देशाची सेवा करतील, असा विश्र्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी व्यक्त केला.

विधान परिषदेच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त कार्यक्रम राष्ट्रपतींच्या उपस्थितीत पार पडला. या वेळी राष्ट्रकूल संसदीय मंडळ-महाराष्ट्र शाखेतर्फे २०१८ ते २०२४ या सहा वर्षातील 'उत्कृष्ट संसदपटू' आणि 'उत्कृष्ट भाषण' पुरस्कारांनी दोन्ही सभागृहातील ५३ आजी-माजी आमदारांनाचा मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. विधिमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात मंगळवारी झालेल्या या समारंभास राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती नीलम गोंर्हे, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे उपस्थित होते.

'बहुत असोत सुंदर, सम्पन्न की महा, प्रिय अमुचा एक, महाराष्ट्र देश हा', या श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या कविताच्या ओळींनी मुर्मू यांनी आपल्या भाषणास प्रारंभ केला. महाराष्ट्र विधिमंडळाच्या स्थापनेच्या इतिहासाचा धावता आढावा मुर्मू यांनी आपल्या भाषणात घेतला. १०३ वर्षे झालेल्या महाराष्ट्राच्या कायदेमंडळाने राज्यातील नागरिकांच्या आशा-आकांक्षांना अभिव्यक्त केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या कायदेमंडळाचे सदस्य होते. आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाचा लाभ या कायदेमंडळाला होणे हे सौभाग्य आहे. आपल्या विधान परिषदेचे सभापती वि. स. पागे यांनी 'मनरेगा' योजना आणली. महाराष्ट्राच्या समृद्ध विधानपरिषदेने लोकशाही परंपरांना समृद्ध केले आहे, असे राष्ट्रपती म्हणाल्या. महिलांकडे पाहण्याची दृष्टी बदलणे, त्यात सुधारणा करणे। **पान २ वर**

## एस.टी.चे एक हजार कामगार संपावर

### लालपरीच्या पाचशे फेऱ्या रद्द, दैनंदिन २२ लाखांचे नुकसान

मुंबई : राज्य परिवहन मार्ग महामंडळाच्या धाराशिव विभागातील कामगारांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी पुन्हा एकदा संपाचे हत्यार उपसले आहे. सर्वसामान्यांच्या जीवनात अनन्य साधारण महत्व असलेल्या ग्रामीण भागातील वाहिनीची चाके कामगारांच्या संपात रूतल्याने सामान्यांसह आगारांचेही लाखो रूपयांचे बुडाले आहे.

जिल्ह्यातील सहा आगारांतून दररोज सव्वा सहाशेवर बसगाड्यांच्या नियोजित फेर्या रद्द झाल्याने पहिल्याच दिवशी २२ लाख रूपयांचा फटका महामंडळाला बसला आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या राज्यस्तरीय कामगार संघटनेच्या कार्यकारिणीची १४ ऑगस्ट रोजी बैठक घेवून कामगारांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी राज्य सरकारला २७ ऑगस्टपर्यंत मुदत दिली होती.



त्यानंतर २८ ऑगस्ट रोजी कामगारांच्या जिल्हास्तरीय कार्यकारिणीने निदर्शने करून ३ सप्टेंबरपासून एसटी महामंडळ कामगार संपावर जाणार असल्याचा इशारा दिला होता. तरीही राज्य सरकारकडून कामगारांच्या मागण्यांची दखल घेण्यात न आल्याने त्याचा विपरीत परिणाम एसटी महामंडळाच्या दैनंदिन कामावर झाला. शुक्रवारी चालक, वाहक व अन्य कामगार कामावर आले नाहीत. त्यामुळे बस आगाराच्या बाहेर आली नाही.

धाराशिव जिल्ह्यात धाराशिव, उमरगा, भूम, तुळजापूर, कळंब व परंडा हे सहा आगार आहेत. धाराशिव आगारातून दररोज १२० नियोजित फेर्या होतात. पैकी मंगळवारी सकाळी १७ फेर्या झाल्या. त्यानंतर चालक, वाहक संपात सहभागी झाले. उमरगा आगाराच्या ११७ नियोजित फेर्या होत्या. पैकी दोनच गाड्या धावल्या. भूम आगाराच्या १०० नियोजित फेर्यांपैकी केवळ चारच फेर्या झाल्या. तुळजापूर आगारातून ९५ नियोजित फेर्यांपैकी २१ फेर्या, कळंब आगाराच्या १५८ नियोजित फेर्यांपैकी ६६ तर परंडा आगारातून । **पान २ वर**

## सोलापुर -हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर टोल वसुली जोमात मात्र खड्ड्या मुळे राष्ट्रीय महामार्ग कोमात

### रस्त्यात खड्डा की खड्डयात रस्ता झोपीचे सोंग घेणाऱ्या अधिकाऱ्याला निलंबित करावं

### जर कोणाचा आपघात झाला तर कंपनीवर व अधिकाऱ्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होणार



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे: सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर नळदुर्ग बसस्थानकासमोर सर्वत्र खड्डेच, खड्डे पडले आहेत. या खड्ड्याकडे पहिल्यानंतर हा राष्ट्रीय महामार्ग आहे की, ग्रामिण भागातील एखादा रस्ता आहे असे वाटत आहे इतकी वाईट अवस्था या महामार्गाची झालेली आहे. राष्ट्रीय महामार्गाची खड्ड्यामुळे इतकी वाईट अवस्था झालेली असताना राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी मात्र याकडे पाहायला तयार नाहीत. आज या महामार्गावरून नळदुर्ग बस स्थानका समोर डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात उमरग्याकडे जाणाऱ्या वाहन चालकांना महामार्गावरील पडलेल्या या खड्ड्यामुळे कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. जीव मुठीत घेऊन वाहन चालक आपले । **पान २ वर**

## संकटग्रस्त बालकांसाठी १०९८ हेल्पलाईन क्रमांक कार्यान्वित

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सोलापूर/प्रतिनिधी: कोणत्याही प्रकारच्या अडचणीत, संकटात सापडलेल्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या ० ते १८ वयोगटातील सर्व बालकांच्या त्वरीत मदतीसाठी चाईल्ड हेल्पलाईन सेवा १०९८ हा क्रमांक संपुर्ण महाराष्ट्र राज्यात कार्यान्वित आहे. महिला व बालविकास विभाग, नवी दिल्ली आणि राज्य शासनाच्या बाल विकास विभागामार्फत ही हेल्पलाईन सेवा सुरु करण्यात आली आहे. या सेवेअंतर्गत संकटग्रस्त बालकांना २४ह्न ७ हेल्पलाईन सेवा उपलब्ध आहे. सदर सेवेचा लाभ बालक स्वतः घेवू शकतो किंवा इतर कोणीही या सेवेद्वारे बालकाला मदत मिळवून देऊ शकतात. १०९८ या टोल फ्री क्रमांकावर वर संपर्क साधून संकटग्रस्त बालकांना मदत करावी, असे आवाहन, महिला व बाल विकास विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणार बोलीभाषेत शिक्षण; पहिली ते चौथीच्या क्रमिक पुस्तकांचे १२ स्थानिक भाषांमध्ये रूपांतर

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सोलापूर/प्रतिनिधी : राज्यातील काही आदिवासी बहुल भागात कोलामी, माडिया गोंडी, वारली यासारख्या भाषांचा वापर दैनदिन व्यवहारात केला जातो. तर या भागातील विद्यार्थ्यांना मराठी माध्यमातून शिक्षण दिले जाते. शैक्षणिक भाषेचा विरोधाभास तसेच मातृभाषेतील बालवाचन पुस्तकांअभावी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये अडथळे निर्माण होतात. त्यापार्श्र्वभूमीवर आदिवासी विकास विभागाने पहिली ते चौथीच्या क्रमिक पुस्तकांचे १२ स्थानिक बोलीभाषांमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. टप्याटप्याने ही पुस्तके उपलब्ध होणार असल्याने आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या बोलीभाषेत शिक्षण मिळणार आहे.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या बोलीभाषेत शिक्षण मिळावे यासाठी केंद्रीय जनजाती कार्य मंत्रालयच्या निर्देशानुसार इयत्ता १ ली ते ४ थी च्या मराठी बालभारती क्रमिक पाठ्यपुस्तकांचे महाराष्ट्रातील कोरकु गोंडी, भिल माथवाडी, मावची, माडिया, कोलामी, भिल बसावे भिल-भिलाबू वारली कोकणा/ कोकणी पावरी व कातकरी या १२ बोलीभाषेत अनुवाद करण्यात येत आहे. आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था अर्थात 'टीआरटीआय' ने त्यांच्याकडे असलेल्या बालभारतीच्या क्रमिक पुस्तकांचे भाषांतर करून शासकीय आश्रमशाळासाठी उपलब्ध केले. त्यामाध्यमातून आदिवासी बहुल भागातील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थी व शिक्षकांना बोलीभाषेतून प्रमाण भाषेकडे नेले जाणार आहे. दरम्यान, पहिल्या टप्प्यात पहिली व दुसरीचे अनुक्रमे ८६८२ व ८७६२ असे एकूण १७ हजार ४४४ पाठ्यपुस्तके उपलब्ध झाली आहे. या पुस्तकांचे वितरण । **पान २ वर**



**राष्ट्रपती द्रौपदीमुर्मू यांनी आज दादरमधील चैत्यभूमी येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेबआंबेडकर यांच्या स्मृतींना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव आंबेडकर, भन्ते राहुल बोधी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सामूहिक त्रिशरण बुद्ध वंदना म्हणण्यात आली.**

## ॲड.राहुल मखरे 'तुतारी' फुंकणार, शरदचंद्र पवारांच्या उपस्थितीत होणार पक्षप्रवेश

**दैनिक यशसिद्धी न्युज**



इंदापुर/अतुल सोनकांबळे: इंदापूरचे माजी नगराध्यक्ष दिवंगत रत्नाकर मखरे यांचे थोरले सुपुत्र ॲड. राहुल मखरे हे शनिवार दि.७ सप्टेंबर २०२४ रोजी पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालयात कार्यकर्त्यांसह दुपारी १२:३० ते ३:३० या वेळेत राष्ट्रवादी काँगेस पक्षात (शरद पवार गट ) आदरणीय शरदचंद्र पवार साहेबांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश करणार असल्याची माहिती गेस्ट हाऊस येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दस्तुरखुद ॲड. राहुल मखरे यांनी दिली.ॲड. राहुल मखरे म्हणाले की, आदरणीय शरदचंद्र पवारसाहेब हे शिव, शाहू,फुले,आंबेडकर यांचा पुरोगामी विचार कृतीतून जगणारं मोठं व्यक्तिमत्व आहे.त्यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षात काम करण्याची माझी इच्छा आहे. मी स्वतः पवार साहेबांना माझी इच्छा बोलून दाखवली आहे. ती त्यांनी मान्य देखील केली. मी पद, प्रतिष्ठा आणि खुर्ची यासाठी कधीच काम केलं नाही. राजकीय आश्रयामुळे कार्यकर्त्यांचे अडलेले कामे होतात.मी पक्षप्रवेशानंतर शरदचंद्र पवारसाहेब व पक्षातील वरिष्ठ पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटना वाढीसाठी काम करणार आहे.असे शेवटी ॲड. मखरे यांनी सांगितले.

## संविधान बदलण्याचा विरोधकांचा अपप्रचार विधानसभा निवडणुकीत चालणार नाही : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अहमदनगर: महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेले संविधान कुणाच्या बापाचा बाप आला तरी बदलू शकत नाही हे त्रिवार सत्य जनतेला कळले आहे त्यामुळे लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी संविधान बदलण्याचा धोका असल्याचा अपप्रचार केल्याने महायुती चे थोडेफार नुकसान झाले आता विधानसभा निवडणुकीत मात्र संविधान बदलण्याचा विरोधकांचा अपप्रचार टिकणार नाही असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय



राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केले. अहमदनगर मधील सहकारी सभागृहात संविधान सन्मान सोहळा आणि तिसऱ्यांदा केंद्रीय राज्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ना. रामदास आठवले यांचा अहमदनगरवासियांकडून भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ना रामदास आठवले बोलत होते.यावेळी विचार मंचावर पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे नेते प्रा. जोगेंद्र कवाडे; आमदार संग्राम भय्या जगताप; प्रा.सुनील मगर; रिपाइं चे जिल्हा अध्यक्ष सुनील साळवे; श्रीकांत भालेराव; :विजय वाकचौरे; सुरेंद्र थोरात; राजा कापसे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

लोकसभा निवडणुकीत शिर्डी मतदारसंघात मला उमेदवारी दिली असती तर दक्षिण नगर ची सुजय विखे यांचीही जागा निवडून आली असती अशी खंत ना.रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केली. महायुती सोबत रिपब्लिकन पक्ष मजबुतीने उभा आहे विधानसभा । **पान २ वर**

# संपादकीय

## माणसांचे भविष्य ठरविते..

विज्ञानावर असलेल्या लोकांच्या विश्वासाचा गैरफायदा घेत भ्रामक विज्ञान लोकांची फसवणूक करत असते. लोकांच्या आरोग्याशी, भावनांशी खेळतानाच आर्थिक शोषणही केले जाते. म्हणूनच फसव्या विज्ञानाचे हे सोंग ओळखणे आवश्यक आहे. मात्र, यासाठी पारखणे, पडताळणी करणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे गरजेचे आहे. फसवे विज्ञान हे खऱ्या विज्ञानाचे एक सोंग असते. त्याला 'फसवे विज्ञान' वा 'भ्रामक विज्ञान' असेही म्हणता येईल. या भ्रामक विज्ञानाचे एक उदाहरण प्रसिध्द आहे. २००० साली चेन्नई येथील रामन पिल्लई नावाच्या व्यक्तीने आपण शास्त्रज्ञ असल्याचा आव आणून आपल्याला पाण्यापासून डिझेल बनविण्याची एक पध्दत अवगत आहे, असा दावा केला होता. आय. आय.टी. मधील तज्ज्ञांनी केलेल्या चाचणीत त्याची फसवाफसवी उघडकीस आली. पाणी ढवळण्यासाठी पिल्लई जो दांडा वापरत होता तो पोकळ होता. त्यात थोडे डिझेल आधीच भरून घेऊन तो ते अलगद पाण्यात मिसळत असे. पुढे सीबीआयने त्याची चौकशी केली आणि आपण फसवाफसवी करीत असल्याचे त्याने कबूल केले. विज्ञानात गृहीतक, अनुमान, प्रयोग, प्रचिती, पुन्हा पुन्हा पडताळणी आणि प्रचिती अशा पायऱ्या असतात. त्यानंतरच निष्कर्ष काढला जातो. नवीन पुरावे मिळाले तर आधीच्या निष्कर्षात योग्य तो बदल केला जातो. त्याच्या मर्यादा मान्य केल्या जातात. स्थापत्यशास्त्राशी नाते सांगणारे फसवे वास्तुशास्त्र सध्या खूपच लोकप्रिय होत आहे. त्यात आग्नेय दिशेला अग्नी म्हणजे शेगडी, चूल असावी तर पश्चिम दिशेला वेस्टपेपर बास्केट असावे म्हणजे घरात समृध्दी नांदेल, असे हास्यास्पद दावे केले जातात. लोक अशा फसव्या छद्म विज्ञानाच्या मागे का जातात, तेही पाहिले पाहिजे. माणूस हा उपजतच एक भावनाशील प्राणी आहे. कशावर तरी श्रध्दा ठेवावी, अशी त्याची मानसिकता असते. प्रश्न विचारणे, खरे-खोटे पारखणे या गोष्टी त्याला शिकवाव्या लागतात. सतराव्या शतकाच्या सुरुवातीला विज्ञानाचा उदय झाल्यावर विविध प्रकारच्या ऊर्जांचा शोध लागला. जेम्स वॅट यांचा वाफेच्या ऊर्जेचा शोध प्रसिध्द आहे. अणू ऊर्जा, सूर्य ऊर्जा, आघातातून निर्माण होणारी ध्वनी ऊर्जा अशा विविध ऊर्जा भौतिक शास्त्रात अभ्यासल्या जातात. या ऊर्जा मोजण्याची शास्त्रीय एकके असतात. जसे ध्वनी ऊर्जा ही डेसिबल्समध्ये तर विद्युत शक्ती वॉटस्मध्ये मोजतात. परंतु छद्म विज्ञानामध्ये मंगळ, शनी अशा ग्रह गोलांपासून वैश्विक ऊर्जा निघते आणि ती निवडक माणसांचे भविष्य ठरविते,

# कल्याणकारी योजना आणि नागरिक यांना जोडणारा उपक्रम.... मुख्यमंत्री योजनादूत

**दैनिक यशसिद्धी न्युज**

महाराष्ट्र शासन राज्यातील नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवत आहे. या लोक कल्याणकारी योजनांचे प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने शासन आपल्या दारी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात सुरू केलेला होता. या उपक्रमाच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या दारापर्यंत जाऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत होता. या अंतर्गत राज्यातील लाखो नागरिकांना विविध शासकीय योजनांचा एका छताखाली लाभ देण्यात शासन यशस्वी झाले होते. याच उपक्रमाचा विस्तार म्हणजे मुख्यमंत्री योजना दूत असून याचा मुख्य उद्देश सामाजिक बदल घडविण्यासाठी उत्सुक असलेल्या ५० हजार उत्साही तरुणांच्या समर्पित प्रयत्नाद्वारे जनतेपर्यंत पोहोचणे हा आहे. कल्याणकारी योजना आणि नागरिक यांना जोडणारा उपक्रम म्हणजेच मुख्यमंत्री योजनादूत होय.

**कार्यक्रमाची रुपरेषा:-**

१) महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री योजनादूत कार्यक्रम राबविला जाणार आहे. राज्यात कार्यरत प्रशासकीय यंत्रणेला मदत करण्याकरिता मुख्यमंत्री योजनादूत नेमले जातील.२) ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १ व शहरी भागात ५००० हजार लोकसंख्येसाठी १ योजनादूत या प्रमाणात एकूण ५० हजार योजनादूतांची निवड करण्यात येईल. ३) मुख्यमंत्री योजनादूतास प्रत्येकी १०,००० प्रती महिना एवढे ठोक मानधन देण्यात येईल. (प्रवास खर्च, सर्व भत्ते समावेशित)४) निवड झालेल्या मुख्यमंत्री योजनादूतासोबत ६ महिन्यांचा करार केला जाईल व हा करार कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नाही.

**उमेदवार निवड प्रक्रिया निकष-**

उमेदवाराचा वयोगट १८ ते ३५ असावा. कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर असावा. उमेदवाराला संगणक ज्ञान असणे आवश्यक. उमेदवाराकडे अद्यावत मोबाईल असणे आवश्यक. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक. उमेदवारांचे आधार कार्ड असावे व त्याच्या नावाचे बँक खाते आधार संलग्न असावे.

**उमेदवारांनी सादर करावयाची कागदपत्रे-**

विहित नमुन्यातील मुख्यमंत्री योजना दूत कार्यक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज. आधार कार्ड. पदवी उत्तीर्ण असल्याबाबतचे पुराव्या दाखल कागदपत्रे/ प्रमाणपत्र इत्यादी. अधिवासाचा दाखला (सक्षम यंत्रणेने दिलेला). वैयक्तिक बँक खात्याचा तपशील. पासपोर्ट साईज फोटो. हमीपत्र (ऑनलाइन अर्जासोबत च्या नमुन्यामध्ये)

**उमेदवारास होणारे फायदे-**

प्रत्यक्ष कामाचा अनुभव. सामाजिक बदलाचा भाग होण्याची संधी. विद्या वेतनातून युवकांना आर्थिक सहाय्य. शिकण्याबरोबरच कौशल्य विकास. सरकारी कामकाजाचा अनुभव.

**मुख्यमंत्री योजनादूताची नेमणूक प्रक्रिया:-**

१) उमेदवारांच्या नोंदणीची व प्राप्त अर्जाच्या छाननीची प्रक्रिया माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे नियुक्त करण्यात बाह्यसंस्थांमार्फत ऑनलाईनरीत्या पूर्ण करण्यात येईल.२) ऑनलाईनरीत्या प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी राज्यातील प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येईल. जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने, प्राप्त अर्जाशी संबंधित उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी करतील (यामध्ये उमेदवारांची शैक्षणिक व वयोमर्यादेविषयक मूळ कागदपत्रे तपासण्यात येतील). त्यानंतर प्रत्येक उमेदवाराबरोबर ६ महिन्याचा करार केला जाईल. कराराचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाणार नाही.

३) जिल्हा माहिती अधिकारी वरील प्रमाणे शासकीय योजनांच्या माहिती संदर्भात पात्र उमेदवारांचे समुपदेशन व निर्देशन (जीळशपींरींळेप) करतील. ४) जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, (कौशल्य विकास रोजगार) व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या समन्वयाने संबंधित जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १/शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी १ या प्रमाणात उमेदवारांना योजनादूत म्हणून पाठवतील.मुख्यमंत्री योजनादूत या कार्यक्रमांतर्गत उमेदवारांना सोपविण्यात येणारे कामकाज हे शासकीय सेवा म्हणून समजण्यात येणार नाही. सबब, या नेमणूकीच्या आधारे भविष्यात शासकीय सेवेत नियुक्तीची मागणी अथवा हक्क सांगितला जाणार नाही याबाबतचे हमीपत्र निवड झालेल्या उमेदवाराकडून घेण्यात यावे.

**निवड झालेल्या योजनादूताने करावयाची कामे:**

१) योजनादूत संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्या संपर्कात राहून जिल्ह्यातील योजनांची माहिती घेतील. २) प्रशिक्षित योजनादूतांनी त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी समक्ष जाऊन त्यांना ठरवून दिलेले काम पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.३) योजनादूत राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रचार आणि प्रसिद्धी करतांना ग्राम पातळीवरील यंत्रणांशी समन्वय करून शासनाच्या योजनांची घरोघरी माहिती होईल यासाठी प्रयत्न करतील. ४) योजनादूत दर दिवशी त्यांनी दिवसभर केलेल्या कामाचा विहित नमुन्यातील अहवाल तयार करुन तो ऑनलाईन अपलोड करतील. ५) योजनादूत त्यांना सोपविलेल्या जबाबदारीचा स्वतःच्या स्वार्थासाठी/नियमबाह्य कामासाठी उपयोग करणार नाहीत, तसेच ते गुन्हेगारी स्वरुपाचे/गैरवर्तन करणार नाहीत. योजनादूत तसे करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यासोबत करण्यात आलेला करार संपुष्टात आणण्यात येवून त्यांना जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल. ६) योजनादूत अनधिकृतरित्या गैरहजर राहिल्यास किंवा जबाबदारी सोडून गेल्यास त्याला मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

*उपसंचालक (माहिती), जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांची जबाबदारी:-

१) विभागीय स्तरावर विभागीय संचालक / उपसंचालक (माहिती) या योजनेचे सनियंत्रण करतील. जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या कार्याचा आढावा विभागीय स्तरावर घेतला जाईल. २) जिल्हा माहिती अधिकारी हा सदर योजनेसाठी संबंधित जिल्हयाचा नोडल ऑफीसर असेल. ३) संबंधित जिल्हयातील योजनादूतांनी विहित नमुन्यात ऑनलाईन अपलोड केलेल्या त्यांच्या दैनंदिन कामकाजाचा आढावा जिल्हा माहिती अधिकारी घेतील तसेच, संबंधित योजनादूतांना त्यांच्या कामकाजामध्ये मार्गदर्शन करतील.

*योजनादूत कार्यक्रमाच्या संचलनासाठी बाह्यसंस्थांमार्फत करावयाची कामे:-

१) उमेदवारांची ऑनलाईन नोंदणी करणे. २) उमेदवारांच्या प्राप्त अर्जाची तसेच, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रांची छाननी करणे व पात्र उमेदवारांच्या नावांची यादी जिल्हा माहिती अधिकारी यांना ऑनलाईन उपलब्ध करुन देणे.३) निवडण्यात आलेले योजनादूत यांना जिल्हा माहिती अधिकारी यांच्या समन्वयाने समुपदेशन व निर्देशन (जीळशपींरींळेप), कामकाजाचे वाटप इ. बाबतीत सनियंत्रण करणे.४) योजनादूतांना कामाचे वाटप झाल्यानंतर त्यांच्या दैनंदिन उपस्थितीबाबतचा (हजेरी) ऑनलाईन पद्धतीने अहवाल घेणे. मुख्यालय स्तरावरील उपसंचालक (वृत्त) (नोडल ऑफीसर) यांना याबाबत आवश्यक असेल तेव्हा माहिती देणे. तसेच, उपस्थितीबाबतचा व अन्य बाबींचा साप्ताहिक अहवाल त्यांना सादर करणे.५)योजनादूतांनी प्रत्येक दिवशी केलेल्या कामाचा ऑनलाईन अहवाल घेणे. तद्नंतर सदरचा अहवाल जिल्हा माहिती अधिकारी व नोडल ऑफिसर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांना पाठविणे.६) योजनादूतांच्या मानधनाची देयके तयार करुन जिल्हा माहिती अधिकारी यांना सादर करणे. त्याव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय बाबी सादर करणे.

***अर्थसंकल्पीय तरतूद-** या कार्यक्रमाच्या अंमबजावणीसाठी ५० हजार योजनादूत यांना प्रतिमा १० हजार रुपये याप्रमाणे सहा महिन्याकरिता अंदाजे ३०० कोटी इतका खर्च येणार आहे. हा खर्च कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत करण्यात येईल. योजना दूतांनी ठरवून दिलेल्या उद्दिष्ट प्रमाणे काम केले आहे का नाही याची खातरजमा माहिती जनसंपर्क विभाग करेल व त्यानंतरच योजनादुताना मासिक मानधन अदा करण्यात येईल. ही कार्यवाही प्रत्येक महिन्याच्या दोन तारखेपर्यंत पूर्ण करण्यात येईल.

***सुमारे ५० हजार योजनादूतची भरती-** मुख्यमंत्री योजना दूध अंतर्गत माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने राज्यभरात सुमारे ५० हजार योजनादूत पदांची सहा महिन्यासाठी भरती केली जाणार आहे. या योजने अंतर्गत प्रत्येक योजना दूत ला प्रतीमहा दहा हजार रुपये मानधन देण्यात येणार असून राज्याच्या कौशल्य विकास नाविन्यता रोजगार विभागाच्या वतीने हे मानधन निवड झालेल्या उमेदवाराच्या थेट बँक खात्यात जमा होणार आहे. राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी(२७८३४), प्रत्येक नगरपालिका क्षेत्रासाठी(५३८३) एक तर महानगरपालिकेच्या १२९६ वार्ड साठी प्रत्येकी एक याप्रमाणे राज्यात एकूण ४७ हजार ५१६ योजना दूत ची निवड केली जाणार आहे. म्हणजे शहरी भागात १९ हजार ६८२ व ग्रामीण भागात २७ हजार ८३४ योजना दूत लवकरच निवडले जाणार आहेत. याप्रमाणे राज्य शासन प्रत्येक ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रात मुख्यमंत्री योजनादूताची नेमणूक करून शासकीय योजनांचा प्रचार व प्रसार करणार आहे. या पन्नास हजार योजनादुतांना जिल्हास्तर तसेच उपविभाग स्तरावर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून हे योजनादूत कल्याणकारी योजना आणि नागरिक यांना जोडणारा दुवा ठरतील व प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील याची खात्री वाटते.

**सुनील सोनटक्के**
जिल्हा माहिती अधिकारी सोलापूर

पान १ वरुन

## आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणार

आश्रमशाळास्तरावर सुरु आहे. उर्वरित पाठ्यपुस्तके लवकरच प्राप्त होणार असून, त्यानंतर त्यांचेही आश्रमशाळास्तरावर वितरण केले जाणार असल्याचे आदिवासी विकास विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**१२ स्थानिक भाषांमध्ये रूपांतर** राज्यातीन आदिवासी बहुल जिल्ह्यात इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण स्थानिक बोलीभाषेत देण्याचा मानस आहे. जेणेकरून प्राथमिक स्तरापासून विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वृद्धिगत होणे सुलभ होईल. बोलीभाषा ते प्रमाणभाषा असा विद्यार्थ्यांचा अध्ययन प्रवास असेल. त्यासाठी क्रमिक पुस्तकांचे १२ स्थानिक भाषांमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. त्यामाध्यमातून आदिवासींच्या बोलीभाषेचे संवर्धन करण्याचा प्रयत्न असणार आहे.

**बोलीभाषानिहाय अनुवादित पाठ्यपुस्तकांची संख्या** कोरकु-१६४३. गॉडी- २६५३. भिल माथवाडी ३४०६. मावची १५७६. माडिया- १३२० कोलामी- २१० भिल बसावे-१५९६, भिल-भिलावू २२०९, वारली ८२४४ कोकणा/कोकणी ६९८९ पावरी- ६४९३. कातकरी- १०४६. एकूणः ३७,३८५.

## संविधान बदलण्याचा विरोधकांचा

निवडणुकीत महायुती चे १८० पर्यंत आमदार निवडून आणण्यासाठी रिपब्लिकन पक्ष महायुतीला साथ देईल.प्रा जोगेंद्र कवाडे आणि मी आम्ही दोघे रिपब्लिकन नेते महायुती सोबत आहोत त्यामुळे महायुती ने रिपब्लिकन पक्षाकडे लक्ष द्यावे ; रिपब्लिकन कार्यकर्त्यांना सन्मान द्यावा अशी सूचना ना.रामदास आठवले यांनी केली.रिपब्लिकन ऐक्या साठी आम्ही सदैव तयार आहोत.मी केंद्रात मंत्री झाल्यामुळे कवाडे सर मला आमच्या कडे लक्ष द्या म्हणतात पण मी जेंव्हा त्यांच्या कडे लक्ष दिले तेंव्हा ते माझ्यासोबत आले नाहीत १९९० मध्ये ते माझ्या सोबत आले असते तर रिपब्लिकन पक्षाचे १५ जन तरी मंत्री झाले असते मात्र माझ्या सोबत कोणी अन्य गटाचे नेते आले नाहीत त्यामुळे मी एकटाच तेंव्हा मंत्री झालो. राजकारणात कधी कोणाला पाठिंबा द्यायचा हे मला चांगले कळते असे ना. रामदास आठवले म्हणाले.

प्रा जोगेंद्र कवाडे यांनी ना.रामदास आठवले तिसऱ्यांदा केंद्रीय राज्यमंत्री झाल्याबद्दल त्यांच्या सत्कारानिमित्त अभिनंदन केले.डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष देशभर मजबूत केल्याबद्दल त्यांनी ना.रामदास आठवले यांचे कौतुक केले आणि ते केंद्रात मंत्री असल्याचा आम्हाला अभिमान असल्याचे सांगत रिपब्लिकन ऐक्याचा नारा प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी दिला.

या कार्यक्रमात ज्येष्ठ नेते प्रा.जोगेंद्र कवाडे आणि केंद्रीयराज्य मंत्री ना.रामदास आठवले यांच्या भाषणाची जुगलबंदी नगरकरांना अनुभवण्यास मिळाली.

तू मत कर अगर मगर
तेरे शहर का नाम है अहमदनगर
मुझमे और कवाडे सर मे है दलित मुक्ती की जिगर

अशा अनेक उत्स्फूर्त कविता सादर करीत ना.रामदास अठवले यांनी सभागृह जिंकले.

## महिलांकडे बघण्याचा

ही सर्वांची जबाबदारी आहे. स्वातंत्र्याच्या शतकपूर्तीच्या पार्श्र्वभूमीवर महिलांविषयीचा योग्य दृष्टिकोन विकसित होईल. राजमाता जिजाबाईंची ही भूमी आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिला शिक्षणाचा पाया घातला गेला. महिलांना भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा थांबायलाच हव्यात. महिला राष्ट्रपती होण्याचा मान प्रतिभा पाटील या मराठी महिलेकडे जातो. महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक, मुख्य सचिव, उपसभापती या महिला आहेत.

महाराष्ट्राच्या मुली देश आणि राज्याचा गौरव वाढवतील, असा विश्र्वासही मुर्मू यांनी व्यक्त केला.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मालवणमधील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कोसळलेल्या पुतळ्याचा संदर्भ देत 'महाराज आमच्या ह्रदयात आहेत' असे नमूद केले. मतदारसंघातील कामांसाठी आमदार रात्रंदिवस झटत असतात, या पुरस्काराने त्यांच्या कामाचे कौतुक झाले, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. नीलम गोऱ्हे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. 'विधान परिषदेची आवश्यकता आणि महत्त्व' या ग्रंथाचे प्रकाशन यावेळी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आले.

## एस.टी.च्या एक हजार कामगार संपावर

दररोज धावणार्या ४४ नियोजित बसगाड्यांच्या फेर्यांपैकी केवळ १२ फेर्या झाल्या. कामगारांच्या संपाचा धाराशिव विभागावर चांगलाच परिणाम झाला असून एकूण ६३४ नियोजित फेर्यांपैकी केवळ १२२ फेर्या झाल्या तर ५१२ फेर्या रद्द झाल्या. दररोज ६३४ गाड्यांचे ९८ हजार ६८६ किलोमीटर होते. पैकी ८१ हजार ५०० किलोमीटरच्या फेर्या रद्द झाल्या आहेत. यामुळे सहाही आगाराचे एकूण २२ लाखांचे उत्पन्न बुडाले आहे.

आगारनिहाय रद्द झालेल्या फेर्या व बुडालेले उत्पन्न धाराशिव आगारातून १०३ फेर्या रद्द झाल्या बसफेर्यांतून मिळणारे पाच लाख ४८ हजारांचे संभाव्य उत्पन्न बुडाले आहे. उमरगा आगाराच्या ११५ फेर्या रद्द झाल्याने दोन लाख १९ हजारांचे उत्पन्न बुडाले, भूम आगाराच्या ९६ फेर्या रद्द झाल्याने दोन लाख ७८ हजारांचे उत्पन्न बुडाले, तुळजापूर आगारातून ७४ फेर्या रद्द झाल्या असून सहा हजार ७७ हजार रूपयांचे उत्पन्न बुडाले आहे, कळंब आगारातून ६६ फेर्या रद्द झाल्या असून कळंब आगाराला सव्वा तीन लाखाचा फटका बसला आहे. परंडा आगारातून पहिल्या दिवशी ३२ फेर्या रद्द झाल्या असून दीड लाख रूपयांचे उत्पन्न बुडाले आहे. एकंदरीत धाराशिव विभागातून पहिल्या दिवशी ५१२ बसफेर्या कामगारांच्या संपामुळे रद्द झाल्यामुळे एकूण २२ लाखांचे उत्पन्न बुडाले आहे.

## सोलापुर -हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर

वाहन पुढे घेऊन जात आहेत. त्याचबरोबर खड्डे चुकविण्याच्या नादात अनेकदा याठिकाणी अपघात होऊन महामार्गावरील वाहतुक तासंतास बंद पडत आहे. आठवड्यातुन चार, पाच वेळेस नळदुर्ग येथील राष्ट्रीय महामार्गावर वाहतुक विस्कळीत होऊन वाहनांच्या लांबच, लांब रांगा लागण्याच्या घटना घडत आहेत. मात्र याकडे राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी किंवा महामार्गावर पडलेले खड्डे बुजविण्याची जबादारी ज्या कंपनीची आहे ते याकडे पाहायला तयार नाहीत. त्यांना वटणीवर आणण्यासाठी वाहनचालक व त्रस्त नागरीकांनी फुलवाडी येथील टोलनाक्यावर आंदोलन करून त्यांची मस्ती जिरविणे गरजेचे आहे.राष्ट्रीय महामार्गावरील फुलवाडी येथील टोलनाक्यावर वाहनचालकांकडुन टोल मोठ्याप्रमाणात वसुली केला जात आहे मात्र महामार्गावर पडलेले खड्डे बुजविण्याचे काम टोल वसुली करणारी कंपनी करत नाही ही दुर्दैवाची बाब आहे.

दि. ७ सप्टेंबर पासुन गणेशोत्सवास सुरुवात होणार आहे. गणेशोत्सवापुर्वी या महामार्गावरून नळदुर्ग, जळकोट, उमरगा यासह कर्नाटक राज्यात मोठमोठ्या गणेश मुर्ती वाहनातुन नेल्या जातात अशावेळी महामार्गावर पडलेल्या खड्ड्यामुळे गणेश मुर्तीला इजा झाली तर त्याला जबाबदार कोण. असा प्रश्र्न गणेशभक्तांमधुन विचारला जात आहे. त्यामुळे ७ सप्टेंबरपुर्वी राष्ट्रीय महामार्ग विभाग व टोल वसुल करणाऱ्या कंपनीने नळदुर्ग बसस्थानकासमोर राष्ट्रीय महामार्गावर पडलेले खड्डे बुजवावेत अशी मागणी गणेशभक्तांनी केली आहे. खड्डे बुजविण्याचे काम थातुरमातुर न करता पुन्हा त्याठीकाणी महामार्गावर खड्डे पडु नयेत अशाप्रकारे खड्डे बुजविण्याचे काम होणे गरजेचे आहे.



## सहाय्यक निबंधक अर्पणा यादव यांचा अर्बन बँकेच्या कर्मचाऱ्यांनी केली स्वागत

पंढरपूर : करमाळा तालुक्यातील नूतन सहाय्यक पदी निवडक अर्पणा यादव यांची निवड झाल्याबद्दल अर्बन बँकेच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सत्कार केला यावेळी अर्बन बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश शिरसागर व सहाय्यक निबंध बेदारी यांच्या समवेत करमाळा अर्बन बँकेचे कर्मचारी, नागरिक आधी मोठ्या संख्येने उपस्थित होते

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# लाडकी बहीण योजनाच्या लाभासाठी आरबीएल बँकेमध्ये के.वाय.सी करण्यासाठी महिलांची तारांबळ




**दैनिक यशसिद्धी न्युज**

उल्हासनगर/प्रतिनिधी : महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र लाडकी बहीण योजना सुरू केल्यापासून बँकांमध्ये महिलांची मोठ्या प्रमाणे गर्दी दिसत आहे मात्र उल्हासनगर मधील आरबीएल बँक या ठिकाणी महिलांना केवायसी करण्यासाठी बँकेतून त्यांना टोकन दिले जाते ते टोकण ३० दिवस ते ४५ दिवस असे तारखा महिलांना मिळत असल्याने महिला वर्ग चिंतेत आहे या प्रकरणी यश सिद्धी न्यूज चे प्रतिनिधी या संबंधित बँक मॅनेजर कडे चौकशी केली असता बँक मॅनेजरने सांगितले की आमच्याकडे स्टाफ कमी असल्यामुळे आम्हाला महिलांना ३० दिवस ४५ दिवस असे टोकन देत आहोत असे त्यांनी सांगितले. आपण आरबीएल बँक यांच्याकडे आपण चौकशी करू शकता असेही त्यांनी कळवले त्यानंतर प्रतिनिधी यांनी आरबीएल बँक यांच्याकडे या प्रकरणाबद्दल माहिती घेताना ते म्हटले की आरबीएल बँक उल्हासनगर मॅनेजर यांनी स्टाफ वाढवावा असे तुम्ही त्यांना सांगा मात्र बँक मॅनेजरने सांगितले की मला मेन पॉवर नसल्यामुळे मला स्टाफ वाढवता येत नाही .या कारणामुळे महिलांना केवायसी करण्यासाठी दिवसेंदिवस वाढत असल्याने महिलावर्ग चिंतेत आहे या प्रकरणाचा असे दिसून येते की बँक महिलांचे जाणीवपूर्वक त्रास देण्याचे काम तर करत नाही ना असे दिसून येते

# बाबा ग्रुप फाउंडेशनच्या वतीने भोजनदान

**दैनिक यशसिद्धी न्युज**

ठाणे/प्रतिनिधीः बाबा ग्रुप फाउंडेशन च्या माध्यमातून अंकुर बाल विकास केंद्र डोंबिवली येथे मुलांना भोजन वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. यावेळी बाबा ग्रुप फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत जाधव, उपाध्यक्ष सागर गायकवाडखजिनदार हरेश जाधव, सदस्य दीपक जाधव, विकास धनगर ,ऋतिक जाधव ,आदित्य जाधव उपस्थित होते.



# 'प्रसादरुपी खुराक मानांकन चाचणी कुस्ती स्पर्धा-२०२४' चे फतेसिंह क्रिडांगण, इन्डोअर स्टेडियम येथे थाटात शुभारंभ



**दैनिक यशसिद्धी न्युज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वछस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली 'प्रसादरुपी खुराक मानांकन चाचणी कुस्ती स्पर्धा-२०२४' चे मंगळवारी फतेसिंह क्रिडांगण, इन्डोअर स्टेडियम येथे थाटात शुभारंभ संपन्न झाला. या स्पर्धेस उदंड प्रतिसाद मिळाला असून, १६० कुस्तीपटूनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेत १० ते १४ वयोगटातील २५ ते ४५ किलो, १४ ते १७ आतील ४५ ते ७० किलो, १७ ते २० आतील ६० ते ९० व खुला, आणि २० ते २५ वयोगटातील ७० ते १०० किलो व खुला असे एकूण वय व वजन गटातील प्रत्येकी प्रथम, द्वितीय व तृतीय असे यशस्वी ३ क्रमांक काढण्यात आले. यातील यशस्वी कुस्तीगीरांना खुरका दिला जाणार असून, ही तालुक्यात प्रथमच मॅटवरील कुस्ती स्पर्धा संपन्न झाले आहे. तब्बल ८ ते १० तास स्पर्धा संपन्न झाली. अमोलराजे भोसले यांच्याकडून यशस्वी कुस्तीदिरांना ट्रॅकसूट देण्यात येणार आहे. या स्पर्धेत मुलींचा सहभाग होता.

दरम्यान श्रींचे पूजन न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वयस्त अमोलराजे भोसले, उपाध्यक्ष अभय खोबर, सचिव शामराव मोरे, विश्र्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, अॅड. संतोष खोबरे, उषाताई हंचाटे, डॉ.आर.व्ही.पाटील, मनोज निकम, डबल उपमहाराष्ट्र केसरी पै.मौलाली शेख, मारुती वडार, शाहू मगर, उपमहाराष्ट्र केसरी पै.भरत मेकाले, एन.आय.एस. कोच राष्ट्रीय पंच पै.धनराज भुजबळ, महाराष्ट्र चॅम्पीयन पै.तानाजी भोसले, के.एल.ई. मंगरुळे प्रशालेचे मुख्याध्यापक नंदाजी कदम, शरद जगदाळे, शरद जंगाले, पै.महेश कुलकर्णी, सरफराज शेख, अतिश पवार, पै.सद्दाम शेरीकर, अभियंता अमित थोरात, राजेश कळमणकर, अरुण उपाध्य यांच्या हस्ते करून स्पर्धेस प्रारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमास अवनिष कल्याणशेट्टी, महांत बिराजदार जेऊर, पिंटू सोनटक्के, प्रकाश सोनटक्के, परमेश्र्वर व्हसुरे, शंभूराजे गोटे, बाबुराव पवार, दत्तात्रय बिराजदार, अमोल कोकाटे, नागराज कलबुर्गी, पिंटू साठे, कल्याणी लकशेट्टी, अविनाश राठोड, मारुतीराव मुळे, सौरभ मोरे, फहीम पिरजादे, श्री गिरव, प्रसाद मोरे, ऋषी लोणारी, महिबूब धडम, भरत पाटील, दिनेश हळगोदे, विश्र्वनाथ मुटगी, निखील पाटील, गोटू माने, प्रवीण घाडगे, मैनुद्दीन कोरबू, बाळासाहेब पोळ, शिवराज स्वामी, पुरोहित संजय कुलकर्णी, राजेंद्र पवार, सत्तारभाई शेख, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, आकशा सुरवसे, शुभम कामनुरकर, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, सुमित कल्याणी, स्वामींनात बाबर, शेखर चौगुले, विठ्ठल रेडी, गोविंदराव शिंदे, राहुल इंडे, काशिनाथ कदम, आकाश गडकरी, बसवराज वाडे, आकाश वाघमारे, ज्ञानेश्र्वर भोसले, यांच्यासह तालुक्यातील कुस्तीगीर, कुस्ती प्रेमी बहुसंख्येने उपस्थित होते. याप्रसंगी वेळ अधिकारी म्हणून माधव लाड व पंच म्हणून लक्ष्मीकांत बिराजदार, रियाज नदाफ, महेश कोळी, शिवाजी परळकर यांनी तर कुस्तीचे सुत्रसंचलन अशोक बनसोडे मंद्रुप यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत अरविंद शिंदे, सूत्रसंचालन क्रीडा भारतीचे अभिजित लोके तर आभार गोटू माने यांनी मानले

**देण्यात येणारे प्रसादरूपी खुराक :**

या 'प्रसादरुपी खुराक मानांकन चाचणी स्पर्धेतील विजेते वजनी गटात तीन प्रथम, द्वितीय, तृतीय मानांकित पैलवानास दरमहा खालीलप्रमाणे प्रसादरुपी लाभ मिळणार आहे. त्यांना तीन किलो तूप, तीन किलो बदाम, एक किलो खारीक, थंडाई मसाला देण्यात येणार आहे.

**कुस्ती क्षेत्राला अच्छेदिन :** कुस्तीला उभारणी व नव चालना, संजीवनी मिळण्यासाठी, नवोदित पैलवानांच्या पाठीवरती कौतुकाची थाप मिळावी, अनेक होतकरू, कष्टकरी पैलवान समोर यावेत याकरिता गत जानेवारी पासून न्यासाकडून प्रसाद रुपी खुराक देण्यात येत आहे. सध्या कुस्तीक्षेत्रामध्ये वैविध्यपूर्ण आणि विकासात्मक प्रयत्न सर्व स्तरातून केले जात आहेत. अनेक मैदानामध्ये नवोदीत होतकरू आणि चांगल्या पैलवानांना पाठबळ मिळवून देण्यासाठी अनेक वस्ताद मंडळी झटत असतात. खऱ्या अर्थाने विविध तालमीतील उदयोन्मुख पैलवान जपत असतात. कुस्ती जगवताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. हे ओळखून श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील कुस्तीगीरांना न्यासाकडून प्रसाद रुपी खुराक देण्यात येत आहे. त्यामुळे कुस्तीगीरांना अच्छे दिन आले आहेत.

**-उपमहाराष्ट्र केसरी पै.भरत मेकाले, सोलापूर**

# द वर्ड स्कूलच्या संचालक मंडळाची जीवे मारण्याची धमकी

## मनीष नरवडे यांची पोलीस आयुक्तांना तक्रार..

**दैनिक यशसिद्धी न्युज**

छत्रपती संभाजीनगरः द वर्ड स्कूलच्या संचालक मंडळ व इतरावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी मनीष नरवडे यांनी पोलीस आयुक्त यांना निवेदनाद्वारे केली आहे. सिडको एन ६, संभाजी कॉलनी येथील महानगरपालिकेने भाडेतत्वावर दिलेल्या साई नॉलेज सोल्युशन संचलित द वर्ल्ड स्कुल या शाळेने अवैध बांधकाम करून विद्यार्थ्यांच्या जीव धोक्यात घातला आहे. शाळेचे अनेक नियमबाहय कारभार सुरू आहे, त्याचप्रमाणे शाळेत विद्यार्थ्यांना होणाऱ्या त्रासाबाबत व शाळेमार्फत विद्यार्थ्यांवरती लादल्या जाणाऱ्या वाढीव शुल्क व अनेक प्रकारच्या सक्ती या प्रकरणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) गटाचे जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी शासकीय कार्यालयांकडे विद्यार्थी व पालक यांच्या हिताकरीता व विद्यार्थ्यांचा जीव वाचविण्याकरीता तक्रारी केलेल्या आहेत, या शाळेचे अनेक बेकायदेशिर प्रकरणे वर्तमानपत्रातून, माहिती अधिकारातून, निवेदने देवून चव्हाट्यावर आणलेले आहे. त्यामुळे द वर्ल्ड स्कुलचे संचालक मंडळ, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी हे त्यांच्यावर प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या दबाव आणून सर्व तक्रारी मागे घेण्यासाठी प्रयत्न करत आहे, त्यांच्यापासून नरवडे यांच्या जिवीतास धोका निर्माण झालेला आहे. ते खोटया नाटया केसेसमध्ये त्यांना अडकू शकतात. रात्री, अपरात्री, अनोळखी व्यक्ती तोंडाला रुमाल बांधून त्याच्या घराकडे रेकी करत आहे.



म्हणून त्यांच्या जिवीताचे बरे वाईट झाल्यास किंवा काही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सदर शाळा, संचालक मंडळ, शिक्षक, शाळेत कार्यरत असलेले शिक्षकेत्तर कर्मचारी, त्यांचे भाडोत्री गुंडे जबाबदार राहतील, अशी तक्रार नरवडे यांनी पोलीस आयुक्तांना निवेदनाद्वारे केली आहे.

# विवेकानंद प्रतिष्ठानची ९ सप्टेंबर २०२४ पासून अक्कलकोट येथे गणेशोत्सव व्याख्यानमाला




**दैनिक यशसिद्धी न्युज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः विवेकानंद प्रतिष्ठानचे गणेशोत्सव निमित्त व्याख्यानमाला यंदाच्या वर्षी सोमवार दिनांक ९ ते १४ सप्टेंबर २०२४ दरम्यान दररोज सायं.६.३० वाजता प्रियदर्शनी सांस्कृतिक भवन, ए-वन चौक, अक्कलकोट येथे होणार असल्याची माहिती विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी पत्रकाद्वारे जाहीर केले. सालाबादाप्रमाणे यंदाही विवेकानंद प्रतिष्ठानचे वतीने अक्कलकोटकरांसाठी नामवंत व्याख्यात्याची विविध कार्यक्रमाची मेजवानी आयोजित करण्यात आली आहे.व्याख्यानमाला ६ दिवस चालणार आहे.या व्याख्यानमालेचे ✻ पहिले पुष्प सोमवार,दि.०९ सप्टेंबर रोजी पार्थ बावस्कर छत्रपती संभाजीनगर प्रख्यात व्याख्याते हे 'भारत काल आज आणि उद्या' ✻ दुसरे पुष्प मंगळवार, दि.१० सप्टेंबर रोजी गणेश शिंदे छत्रपती संभाजीनगर प्रख्यात व्याख्याते जीवन सुंदर आहे ! ✻ तिसरे पुष्प बुधवार, दि.११ सप्टेंबर रोजी गायक अभिजीत कोसंबी, अबोली गिऱ्हे व अमिता घुगरी हे 'रंग जल्लोष' मराठी व हिंदी गाण्याचा बहारदार कार्यक्रम✻ चौथे पुष्प गुरुवार, दि.१२ सप्टेंबर रोजी 'हसवा हसवी' जॉनी रावत (हास्यसम्राट झी मराठी) दिव्येश शीखंडकर व राजदीप कदम✻ पाचवे पुष्प शुक्रवार, दि.१३ सप्टेंबर रोजी धमाल विनोदी बाल नाट्य लेखक दिलीप प्रभावळकर हे 'बोक्या सातबंडे' निर्माते राहुल कर्णिक,रणजीत कदम व दीप्ती जोशी व प्रमुख भूमिकेत आरुष बेडेकर ✻ सहावे पुष्प शनिवार, दि. १४ सप्टेंबर रोजी 'चाणक्य' महानाट्य अभिजात क्रिएशन निर्मित मिलाफ थिएटर्स प्रकाशित नाटक सादर होणार आहे. या व्याख्यानमालेत साहित्य, व्यवस्थापन, अभिनय, जीवन व विनोद या विषयावर चतुरस्त्र व्याख्यान होणार आहे तरी अक्कलकोट तालुक्यातील रसिकांनी व विशेषता तरुण-तरुणी या व्याख्यानमालाचा आस्वाद घ्यावा असे आव्हान प्रतिष्ठानचे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

# डॉ. वंदना जाधव यांच्या नवोपक्रमाची राष्ट्रीय स्तरावर

**दैनिक यशसिद्धी न्युज**

उमरगाः स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशन, महाराष्ट्र यांच्या मार्फत राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक नवोपक्रम स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत मुरुमच्या जिल्हा परिषद कन्या शाळेतील सहशिक्षिका डॉ. वंदना जाधव यांच्या परिपाठातून तयारी स्पर्धा परीक्षेची या उपक्रमाची राष्ट्रीय स्तरावर नुकतीच निवड झाल्याबद्दल त्यांचा सोलापूर येथे एका विशेष कार्यक्रमात सारथीचे शिष्यवृत्ती प्रमुख अशोक काकडे व ज्येष्ठ साहित्यिक संजय जगताप यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सोलापूरचे सकाळ आवृत्तीचे संपादक अभय दिवाण, बालभारतीचे सदस्य योगेश सोनवणे, अजयकुमार लोळगे, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, सोलापूरचे शिक्षणाधिकारी कादरी, सर फाउंडेशनचे संयोजक बाळासाहेब वाघ, सिद्धाराम माशाळे, राजकारण चव्हाण आदींची उपस्थिती होती. राज्यातील उपक्रमशील शिक्षक, अधिकारी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सतत प्रयत्नशील असतात.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी नवनवीन उपक्रम, कल्पनांचा वापर करत असतात. प्रत्येक मुलाला सजग करण्याकरिता राबवलेल्या उपक्रमाची माहिती शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांना व्हावी.

सर्व स्तरातील शिक्षक, अधिकारी यांच्या नवोपक्रशीलता व सृजनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी राष्ट्रीय नवोपक्रम स्पर्धा स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशन, महाराष्ट्र यांच्या मार्फत आयोजित केली जाते.

# वाढदिवसानिमित्त एक वृक्ष लावल्यास शुध्द हवा व आक्सीजन मिळेल : डॉ.अशोक राठोड

**दैनिक यशसिद्धी न्युज**


अक्कलकोट,प्रतिनिधीः वाढदिवसानिमित्त विविध मोठा खर्च करण्यापेक्षा एक वृक्ष लावुन जन्मदिवस साजरा केल्यास ते वृक्ष भविष्यात वटवृक्षात रूपांतर होईल,आणि जिवन अमुल्य प्रदुषण मुक्त व शुध्द हवा व आक्सीजन मिळेल.प्रत्येकाने एक वृक्ष लावण्याचा संकल्प घ्यावे असे अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अशोक राठोड यांनी बोलताना म्हणाले. वाढदिवसाच्या खर्चाला फाटा देऊन काँग्रेस पार्टीचे माजी शहराध्यक्ष बसवराज अळ्ळोळी यांनी क्कलकोट ग्रामीण रुग्णालय परिसरात वृक्ष लागवड केले.त्याप्रसंगी ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने बसवराज अळ्ळोळी यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आले.यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.निखिल क्षीरसागर,बाबासाहेब सुलतानपुरे,दत्तात्रेय चव्हाण,गंगाराम राठोड,विनोद ढंगग, दिनेश गायकवाड, श्रीशैल कुडनुर, शंकर कुंभार, ईरण्णा केशकुरे,फकीरा दलाचे प्रमुख ज्योतिबा पारखे,नवनाथ धस,मनीषा सलगर, विजयालक्ष्मी कोरे,पायल वानखेडे,सुप्रिया कसबे, वैशाली गंभीरे,सविता बिराजदार आदी सह कर्मचारी उपस्थित होते.



# पत्रकार मिलिंद देशपांडे यांना राज्यस्तरीय दर्पणकार पुरस्कार

पत्रकार नामदेव निर्मळे

दतवाड तालुका शिरोळ येथील ज्येष्ठ पत्रकार दैनिक लोकमतचे मिलिंद देशपांडे यांना राज्यस्तरीय दर्पणकार पुरस्कार प्राप्त झाला. पुरस्कार मिळाल्याबद्दल यावेळी सत्कार करताना म.गाधी तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष बाळासाहेब कोकणे, पत्रकार - संजय सुतार, नामदेव निर्मळे, जहांगीर रणमली, संजय चव्हाण आदींनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



# एकही पात्र बहीण लाडकी बहीण योजनेपासून वंचित राहणार नाही : आ.समाधान आवताडे



दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधीः आपण मला पोटनिवडणुकीत मी निवडून दिले आणि राज्यात आपले सरकार आले. त्यामुळे अल्पकाळात ३ हजार कोटींचा निधी मतदारसंघात आणला आहे. माता - भगिनी, शेतकरी, युवकांच्या पाठीशी सरकार खंबीर उभा आहे. राज्य शासनाच्या लाडकी बहीण योजनेचा लाभ सर्व महिलांना मिळायला हवा, ज्यांना लाभ मिळाला नाही, त्याच्यासाठी विशेष कॅम्प घेऊन सर्व महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळेल यासाठी प्रयत्न करू, महिलांच्या हाताला रोजगार मिळावा यासाठी प्रयत्न करू, केंद्र आणि राज्य सरकार आणि आमदार म्हणून मी सुद्धा आपल्या पाठीशी आहे, अशी ग्वाही आ. समाधान आवताडे यांनी हजारो महिलांना दिली. कै महादेवराव आवताडे प्रतिष्ठान आयोजित हळदी कुंकू आणि रक्षाबंधन स्नेह मेळाव्यानिमित्त आलेल्या हजारो महिलांसोबत संवाद साधताना आ. आवताडे बोलत होते. यावेळी मंगळवेढा बाजार समितीचे सभापती सोमनाथ आवताडे, शेखर भोसले, सौ अंजलीताई आवताडे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष सौ वर्षाताई शिंदे, विश्रांती भुसनर, शेखर भोसले, विनोद लटके, दत्तात्रय काळे, द्रोणाचार्य हाके, संदीप आबा पाटील, शशिकांत मेहेत्रे, आकाश आटकळे, संतोष डोंगरे, गणेश मलपे आदीसह हजारो महिला उपस्थित होत्या. यावेळी महिलांनी आ. आवताडे याना राखी बांधली. यावेळी आ. आवताडे यांच्या वतीने सर्व महिलांना स्नेह भोजन आणि ओवाळणी म्हणून साडी भेट देण्यात आली. यावेळी पुढे बोलताना आ. आवताडे म्हणाले कि, मागील तीन वर्षे मला आपले प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली. मात्र हा कालावधी खूप कमी होता. त्यात दीड वर्षे कोरोणा काळ होता, याशिवाय विधानसभेचे अधिवेशन, मंत्रालयातील कामे यासाठी वेळ गेला मात्र रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने आपल्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न आहे.

आपण दिलेल्या संधीमुळे मतदार संघासाठी तीन हजार कोटींचा निधी आणण्यात मला यश आले. पंढरपूर शहर आणि तालुक्याचा विकासाचा जो बॅकलॉग आहे, तो भरून काढायचा आहे. मी जे बोलतो ते करतो आणि जे होणार आहे, तेच बोलतो, त्यामुळे मतदारसंघातील प्रश्न सोडवण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न केला आहे. ईसबावी सह उपनगरी भागात आजही रस्ते, ड्रेनेज, भाजी मंडई, पिण्याचे पाणी या प्रश्नावर खूप काम करावे लागणार आहे.

यावेळी बोलताना राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष वर्षाताई शिंदे म्हणाल्या कि, आ. समाधान आवताडे यांनी आयोजित केलेल्या या रक्षाबंधन सोहळ्याबद्दल महिलांच्या वतीने त्यांचे जाहीर आभार.

राज्यात असलेल्या महायुतीच्या सरकारच्या लाडकी बहीण.योजनेचा सर्व महिलांनी लाभ घ्यावा, ज्यांना लाभ मिळालेला नाही त्यांनी अर्ज करावेत, असेही आवाज शिंदे यांनी केले. भाजप महिला आघाडीच्या तालुकाध्यक्ष सुजाता वगरे यांनी आभार मानले, तर डॉ वृषाली पाटील प्रास्ताविक यांनी केले.

### ३२ हजार भगिनिंचा सहभाग

पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील पंढरपूर शहर आणि २२ गावातील महिलांसाठी १ सप्टेंबर आणि तीन सप्टेंबर या दोन दिवसात रक्षाबंधन आणि हळदी कुंकू समारंभ आयोजित केला होता. या दोन्ही दिवसांत ३२ हजार महिलांनी या सोहळ्यात सहभाग दर्शवला आणि आ. आवताडे यांच्या पाठीशी आपण उभा राहणार असल्याचे दाखवून दिले.

### अध्यात्मिक नगरी भविष्यात औद्योगिक नगरी होईल.

पंढरपूर शहर आणि तालुक्यातील युवकांच्या हाताला इथेच रोजगार मिळावा, आपल्या मुलांना रोजगारासाठी गाव, घर सोडायला लागू नये, यासाठी पंढरपूर साठी कासेगाव येथे एम आय डी सी मंजूर करून आणली आहे. दोन टप्प्यात होणाऱ्या या एम आय डी सी मध्ये शेत माल प्रक्रिया उद्योग उभा राहतील, बचत गट असोत कि छोटे मोठे उद्योजक या सर्वांना यातून विकासाची संधी मिळेल. पंढरपूर शहरसध्या अध्यत्मिक नागरी म्हणून ओळखले जाते, यापुढे औद्योगिक नगरी म्हणून ओळखली जाईल, या तालुक्यातील दहा हजार कुटुंबाला रोजगार मिळेल यासाठी प्रयत्न करू, अशीही ग्वाही यावेळी या. आवताडे यांनी केली.

### सौ अंजलीताई आवताडे यांचा वाढदिवस मंचावर साजरा केला.

आ. समाधान आवताडे यांच्या सुविद्य पत्नी सौ. अंजलीताई आवताडे यांचा मंगळवारी वाढदिवस आहे. त्यामुळे रक्षाबंधन, हळदी कुंकू सोहळ्यास उपस्थतीत हजारो महिलांच्या समक्ष सौ. अंजलीताई आवताडे यांचा केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी आ. अवताडे यांनीहि केक भरवून सौ अंजलीताई आवताडे यांना शुभेच्छा दिल्या.

# रमझान शेख यांची सामाजिक बांधिलकी

दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क

खारघर/प्रतिनिधी : खारघर येथील फरशीपाडा सेक्टर ३४, इंटरनॅशनल फुटबॉल ग्राउंड येथे असलेल्या एका अपघाती वळणावरती वारंवार होणाऱ्या अपघाताचा प्रश्न सोडण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस- शरदचंद्र पवार पक्षाचे युवा कार्यकर्ते होपमिरर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष रमझान शेख आणि यांनी पुढाकार घेतला. दोन दिवसा अगोदर येथे २ अपघात झाल्याचे निदर्शनास येताच रमझान शेख यांनी पनवेल महानगर महानगरपालिका येथे संपर्क साधला व तेथील अधिकाऱ्यांनी सहकार्य करून प्रश्न मार्गी लावण्यात मदत केली. रमझान शेख यांनी फरशीपाडा, खारघर (प्रभाग ३) येथील अपघाती वळणामुळे होणाऱ्या अपघाताचा



प्रश्न सोडण्यासाठी केलेल्या सहकार्याबद्दल पनवेल महानगरपालिकाचे अधिकारी कुणाल गायकवाड यांचे आभार मानले.

# स्वप्निल कुसळे यांनी श्रीविठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतली



दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : स्वप्निल कुसळे हा भारतीय नेमबाज आहे

त्याने २०२४ ऑलिंपिक मध्ये पुरुषाच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन स्पर्धेत कांस्यपदक जिंकले आहे व त्यांनी आज रोजी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले आहे यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके पंढरपूर उपविभागीय अधिकारी श्री सचिन इथापे व मंदिर समितीचे श्री मनोज शोत्री इत्यादी जण उपस्थित होते

# स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च (सर) फाउंडेशन, महाराष्ट्र यांच्यातर्फे शरणप्पा फुलारी यांना राष्ट्रीय नवोपक्रमशील शिक्षक पुरस्कार

दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्यातील नागणसुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुली शाळेतील विषय शिक्षक शरणप्पा फुलारी यांना प्रतिष्ठेचे सर फाउंडेशनच्या राष्ट्रीय नवोपक्रमशील पुरस्कार महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व परीक्षा परिषद पुणेचे सहसंचालिका शोभा खंदारे, डायटचे प्राचार्य इब्राहिम नदाफ ,सर फाऊंडेशनचे राज्य समन्वयक सिद्धाराम माशाळे,बाळासाहेब वाघ,जगताप यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सोलापूर येथे सिंहगड शैक्षणिक संकुलात दोन दिवसीय राष्ट्रीय एज्युकेशनल कॉन्फर्न्स मध्ये देशातील काना कोपऱ्यातून नवोपक्रमशील शिक्षक उपस्थित होते .




शरणाप्पा फुलारी मागील २४ वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात स्वतःचे अस्थित्व सिद्ध करून नवनवीन उपक्रम राबवून विद्यार्थी आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले आहे.शैक्षणिक क्षेत्रातील कार्य उत्कृष्ठ असून शिक्षणाची वारी,माझी समृद्ध शाळा,लोकसहभागातून शाळा समृद्धी,टाकावू पासून टिकावू वस्तू,परिसर संरक्षण,प्लास्टिक मुक्त शाळा ,विद्यार्थी बचत बँक,विद्यार्थी मंत्री मंडळ,इको नेचर क्लब,सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे लोक सहभाग,क्षेत्र भेटी ,शैक्षणिक प्रवास,स्पर्धा परीक्षा अशा शेकडो उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केलं आहे तसेच शाळेचे भौतिक सुविधा मिळवून डिजिटल,स्मार्ट शाळा,टॅब शाळा बनविण्यामध्ये यश संपादन केले आहे . मागील वर्षी दिव्यांग बालकाला दिव्यांगत्ववर मात करून 'दिव्यांग विद्यार्थी बनला झी कन्नड सारेगमप स्टार सिंगर' या विषयी नवोपक्रम सादर केले होते. या नवोपक्रमचा निवड समितीने निवड करून राष्ट्रीय नवोपक्रमशील शिक्षक पुरस्कार मिळाल्याने शरणप्पा फुलारी यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे .

राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याने सीईओ कुलदीप जंगम,प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख,गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे,विस्तार अधिकारी रतीलाल भुसे,सोमशेखर स्वामी,केंद्रप्रमुख शिवाजी शिंदे,केंद्रीय मुख्याध्यापक विद्याधर गुरव,मुख्याध्यापक श्रीशैल दोडमनी,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गंगाधर भोसगी,उपाध्यक्ष बसवराज तेग्गीनकेरी,शिक्षण तज्ञ गुरुबाई प्रचंडे ,ग्रामपंचायत प्रतिनिधी सिद्धेश्र्वर गंगोंडा,सरपंच,उपसरपंच सर्व सदस्य,पालक ग्रामस्थांनी शुभेच्छा दिले आहे.

# अखेर सुयोगच्या कुटुंबाला न्याय मिळाला

दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर नगरपालिकेच्या जलतरण तलावात बुडून मृत्यू झाल्या प्रकरणी पंढरपूर न्यायालयाने मयत सुयोग संगीतराव यांच्या कुटुंबीयांना पुढील तीन महिन्यात सहा टक्के व्याज दराने ११ लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. २०१० मध्ये सुयोग संगीतराव याचा जलतरण तलावात बुडून मृत्यु झाला होता.

याबद्दल सविस्तर माहिती अशी की, पंढरपूर नगरपालिकेच्या वतीने २०१० मध्ये जलतरण तलाव सुरू करण्यात आला होता. या जलतरण तलावाचा ठेका पुणे येथील कंपनी क्रिस्टल टूल्स अँड स्पा या कंपनीकडे देण्यात आला होता. सुयोग संगीतराव हा तरुण या जलतरण तलावामध्ये पोहताना मृत्युमुखी पडला होता. या विरोधात सुयोगच्या पालकांनी पंढरपूर न्यायालयात दाद मागितली होती.

यामध्ये पंढरपूर नगरपालिका, जलतरण तलावाचे काम करणारे सालिम् कंन्स.कंपनी व पंचवाडकर, जलतरण तलाव चालवणारी कंपनी क्रिस्टल पूल्स अँड स्पा, कंपनीचे मालक निलेश दामादर् शुल्क यांच्या विरोधात दावा दाखल केला होता. दोन्ही बाजू ऐकल्यानंतर न्यायालयाने पंढरपूर नगरपालिका, क्रिस्टल पूल्स अँड स्पा, कंपनीचे मालक निलेश शुक्ल यांना पुढील तीन महिन्यात सहा टक्के व्याजदराने ११ लाख रुपये संगीतराव कुटुंबांना देण्याचे आदेश दिले आहेत.न्यायालयाच्या या दणक्याने पंढरपूर नगरपालिकेमध्ये अनागोंदी कारभार चालतो यावर शिक्कामोर्तब झालं आहे. सुयोगच्या कुटुंबाच्या वतीने ऍड. अल्ताफ शहाणूरकर यांनी बाजू मांडली होती. तब्बल १४ वर्षे चाललेल्या या खटल्यामध्ये अखेर सुयोगच्या कुटुंबाला न्याय मिळाला आहे.

# भक्ती चळवळीने सर्वसामान्यांना अध्यात्माचा अधिकार दिला हीच खरी क्रांती : प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे

दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूरचा विठ्ठल हा सर्वसामान्य माणसांचा देव आहे. तो सर्वांनाच सहज उपलब्ध होतो. सहाव्या आणि सातव्या शतकात भक्ती चळवळ दक्षिण भारतात निर्माण होऊन ती संपूर्ण देशभर पसरली. संस्कृत भाषेत अडकलेले ज्ञान सर्वसामान्य माणसांना उपलब्ध करून देवून त्यांना भक्तीच्या चळवळीत सामील करून घेण्याचे फार मोठे काम मराठी संतांनी केले आहे. कर्मकांडात अडकलेले आध्यात्म भक्ती चळवळीच्या माध्यमातून सर्वसामान्यांना उपलब्ध करून दिले ही खरी क्रांती होती. असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या ऑडीट विभागाचे सहसचिव तथा छत्रपती शिवाजी कॉलेज साताराचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात रुसा कंपोनंट आठ अंतर्गत इतिहास विभागाच्या वतीने 'भक्ती चळवळ: ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि तात्विक दृष्टिकोनातून अभ्यास' या विषयावरील एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. धनाजी मासाळ, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. विष्णू वाघमारे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंत कवळस, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, सेवानिवृत्त डॉ. विकास कदम, सेवानिवृत्त डॉ. हनुमंत लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते. यांनी दिली आहे.

प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे पुढे म्हणाले की, मराठीसह अनेक प्रादेशिक भाषेत अध्यात्माचे तत्त्वज्ञान सामान्यांना अवगत करता येईल. असा भक्तीचा साधा आणि सोपा मार्ग संतांनी उपलब्ध केला. ही भक्ती चळवळीची खरी ताकद आहे. त्यामुळेच सर्वसामान्य जाती, पंथातील आणि धर्मातील संत निर्माण होवू शकले. मोक्षाची वेगळ्या स्वरूपातील संकल्पना विकसित करण्याचे कार्य संतांनी केले.

चर्चासत्राचे बीजभाषण करताना डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले की,मध्ययुगीन कालखंडात देशात राष्ट्रीय भावना अस्तित्वात नव्हती. आठशे पासष्टहून अधिक संस्थाने भारतात अस्तित्वात होती. त्या संस्थांमध्ये एकोप्याची भावना नव्हती. बादशहा अकबर हा सौदर्य दृष्टी लाभलेला ज्ञानोपासक राजा होता. त्याच्या दरबारात किताबखाना म्हणून स्वतंत्र ग्रंथालय होते. रामायण आणि महाभारत यासारख्या




ग्रंथामध्ये प्रसंग चित्रे रेखाटण्यासाठी साठहून अधिक चित्रकार होते. त्यांना स्वत: रंग तयार करून त्याचा वापर करावा लागत असे. तंजावर येथील सरफोजी राजे भोसले हा ज्ञानउपासक राजा होता. त्यांनी जगभरातून देव आणि धर्म विषयक अनेक ग्रंथांचे संकलन केले होते. ख्रिस्ती धर्माच्या प्रचार आणि प्रसाराला येथील भक्ती चळवळ हा फार मोठा अडसर होता. छत्रपती शिवाजी महाराज यांना स्वराज्य निर्माण करण्यात पृष्ठभूमी तयार करण्याचे काम भक्ती चळवळीने केले.

या चर्चासत्रात तुळजापूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. सतीश कदम, प्रा. डॉ. विष्णू वाघमारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या चर्चासत्रात प्राध्यापक, शिक्षक आणि संशोधक विद्यार्थी यांनी भक्ती चळवळीच्या संबंधित विषयावर संशोधन पेपर सादर केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. रविराज कांबळे यांनी केले. तर प्रमुख पाहुण्यांच्या परिचय डॉ. उमेश साळुंखे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भारती सुडके यांनी केले. हे चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी या चर्चासत्राचे समन्वयक प्रा. डॉ. दत्तात्रय चौधरी, प्रा. श्रीमती सुमन केंद्रे, प्रा. कल्याण वाटाणे, प्रा. बाळासाहेब गायकवाड, प्रा. मयूर चव्हाण आदी शिक्षक तर अभिजित जाधव, ओंकार नेहतराव, अमोल माने, सुरेश



# सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे:: रामा बेडक्याळे

टाकळीवाडी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील सामाजिक कार्यकर्ते रामा बेडक्याळे यांचा ०४/०९/२०२४ हा वाढदिवस असून नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. बौद्ध समाजाला स्वयंपाकासाठी संपूर्ण भांडी सट देण्यासाठी पुढाकार तसेच रिंगण सोहळ्यामध्ये महाप्रसादासाठी मोठा हातभार लावला. कोणतेही वैयक्तिक अडचणी असो त्या सोडवण्यासाठी नेहमी तत्पर असतात. अनेक धार्मिक कार्यात हातभार असतो.